



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ११९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.११ डिसेंबर २०२४


## राजकारणातून समाजहित जपणारा नेता गमावला - मुख्यमंत्री फडणवीस




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल सोमनहल्ली मैल्लया कृष्णा तथा एस.एम.कृष्णा यांच्या निधनाने, आपल्या राजकारणातून समाजहित जपणारा आणि देशाच्या सेवेसाठी समर्पित भावनेने कार्यरत असलेले नेतृत्व आपण गमावले आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस आपल्या संदेशात म्हणतात, श्री. एस. एम. कृष्णा यांनी लोकहिताच्या कामासाठी पदे असतात हे ओळखून त्यांनी लोकांचे जीवन उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून काम करताना त्यांनी राज्याला मार्गदर्शन करण्याचे काम केले. विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा, राज्यसभा अशा सर्व सभागृहात काम करताना त्यांनी, विधानसभा अध्यक्ष, मंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्यपाल अशी सर्व पदे भूषविली. विद्यापीठ सुधारणा हे त्यांचे आवडीचे क्षेत्र होते. विशेषतः बंगळुरूचे माहिती आणि तंत्रज्ञान शहरात रूपांतर करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन २०२३ मध्ये त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचे हे कार्य कायम स्मरणात राहील. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. हे दुःख सहन करण्याची ताकद त्यांच्या कुटुंबियांना लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना !

## अडेगाव येथे दोन कुटुंबात मारहाण



**अक्षराज : राजू गागरे**

**दि.१०, झरी (यवतमाळ) :** तालुक्यातील अडेगाव येथे जागेच्या वादावरून दोन कुटुंबात मारहाण झाली. या मारहाणीत लोखंडी सळाख व फावड्याचा वापर करण्यात आला. याप्रकरणी मुकुटबन पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी देण्यात आल्या आहेत. यानंतर पोलिसांनी दोन्ही बाजूच्या पाच जणांवर गुन्हा नोंद केला आहे. दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, रामदास नथ्थू पाचभाई (७२) हे अडेगाव ता. झरी येथील रहिवासी आहे. शेजारी सुधाकर पुंडलीक पेटकर (५०) हे त्यांच्या कुटुंबीयांसह राहतात. पाचभाई यांना त्यांच्या घराच्या भिंतीची छपाई करायची होती सोमवारी दिनांक ९ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास पाचभाई यांनी पेटकर यांना त्यांच्या घरावरील टीन त्यांच्या हद्दीत सरकवण्याची सांगितले. यावेळी दोघांत वाद झाला.

सुधाकर यांचा मुलगा गणेश पेटकर(३०) याने फावड्याने रामदास यांच्यावर फावड्याने वार केला. यात रामदास यांच्या बोटाला दुखापत झाली. तर सुधाकर याने हातातील सळाखीने रामदास यांच्या डोक्यावर वार केला. यात कानाच्या मागच्या बाजूस दुखापत झाली. याच वेळी रामदास पाचभाई यांचा मुलगा तुळशीराम पाचभाई (४५) हा मध्यस्थी करण्यास आला. तेव्हा त्यांनी तुळशीराम यांना देखील सळाखीने मारहाण केली. सुधाकर याचे जावई रमेश धुर्वे (४०) याने दोघांना जीवे मारण्याची धमकी दिली. दरम्यान गावातील लोक जमा झाले व त्यांनी भांडण सोडविले. तर दुसऱ्या तक्रारीत, रामदास यांनी सुधाकर यांना छपाईसाठी टीन सरकवण्यास सांगितले. मात्र छपाईच्या बाजूने तुमची जागा नसल्याने तुम्हाला या बाजूने छपाई करता येणार नाही, असे त्यांनी सांगितले. मात्र रामदास व त्याचा मुलगा तुळशीराम यांनी बळजबरी सुधाकर यांच्या घराचे टीन व फाटे सरकवण्यास सुरुवात केली. यावेळी रामदास पाचभाई यांनी शिविगाळ करीत त्यांच्या हातातील लोखंडी सळाख सुधाकर यांच्या डोक्यावर मारली. मारहाणीत सुधाकर यांचे डोके फुटले. तर तुळशीराम पाचभाई याने हातातील फावड्याने सुधाकर यांचा मुलगा गणेश याच्या डोक्यावर प्रहार केला. या मारहाणीत त्याचे देखील डोके फुटले. यावेळी रामदास यांनी पुन्हा छपाईसाठी वाद घालाल तर जीवे मारणार अशी धमकी दिली.

## ठाणे जिल्ह्यातील शेतक-यांना मिळणार 'फार्मर आयडी'

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१०, ठाणे :** केंद्र शासनाची अँग्रीस्टँक ही योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून या माध्यमातून जिल्ह्यातील प्रत्येक शेतक-याला 'फार्मर आयडी' दिली जाणार आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ ठाणे जिल्ह्यातील शेतक-यांना जलदगतीने व परिणामकारक पध्दतीने होण्यासाठी कृषी क्षेत्रांसाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी अँग्रीस्टँक ही योजना राबविली जाते आहे. या योजनेचे काम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सुरू करावे, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल घुगे यांनी दिले.केंद्र शासनाने अँग्रीस्टँक योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार अँग्रीस्टँक हे कृषी क्षेत्रातील डेटा व डिजिटल सेवा वापरून शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतक-यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारक पोहचविण्यासाठी मदत होणार आहे. अँग्रीस्टँक संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी गट विकास अधिकारी व ग्राम विकास अधिकारी यांचे नियोजन व कामकाजाकडे नियंत्रण असणार आहे अशी माहिती कृषी विकास अधिकारी एम एम बाचोटीकर यांनी दिली. कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे हा अँग्रीस्टँक उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पामुळे माहिती आधारित योग्य निर्णय घेणे, गरजू शेतक-यांना योग्य वेळी सेवा प्रदान करणे, कृषी उपक्रमांची कार्यक्षमता सुधारणे, विविध शेतकरी आणि कृषी- केंद्रीत योजना आखणे व अंमलबजावणी करणे या गोष्टी सुलभ होणार आहेत. सर्व ग्रामपंचायतीमार्फत शिबीरांचे नियोजन करण्यात येणार असून शेतक-यांना शेतकरी ओळखपत्र तयार करून दिले जाणार आहे. शेतक-यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच निर्मितीमध्ये पथकातील कर्मचारी प्राथमिक जबाबदारी पार पाडणार आहेत.

# कुर्ला बस अपघातात ४३ जखमी, सात जणांचा मृत्यू : ४५ जणांवर उपचार सुरु

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, मुंबई :** कुर्ला पश्चिम येथील महापालिकेच्या एल विभाग कार्यालयाजवळ सोमवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास बेस्ट बसचा भीषण अपघात झाला. बेस्ट बसने अनेक वाहने आणि पादचाऱ्यांना धडक दिली. या अपघातामध्ये ४९ जण जखमी झाले. यापैकी सात जणांचा मृत्यू झाला. कुर्ला येथील भाभा रुग्णालयामध्ये चार, शीव रुग्णालय, कोहिनूर रुग्णालय, हबीब रुग्णालयात प्रत्येकी एका रुग्णाचा मृत्यू झाला. या अपघातामुळे कुर्ला आणि आसपासच्या परिसरात शोकाकळा पसरली आहे.

कुर्ला पश्चिम येथून अंधेरीला जाणाऱ्या बेस्ट बसच्या चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. त्यानंतर या बसने रस्त्यावरून जाणाऱ्या काही खासगी वाहनांसह रिक्षा आणि अनेक पादचाऱ्यांना धडक दिली. या अपघातात ४९ जण जखमी झाले. अपघातात जखमी झालेल्यांना तातडीने कुर्ला येथील भाभा रुग्णालय, शीव रुग्णालय आणि काही खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. भाभा रुग्णालयात ३८ जणांना उपचारासाठी आणण्यातआले होते. यापैकी ५ जणांना हबीब रुग्णालयात, ४ जणांना शीव रुग्णालयात, तसेच क्रिटीकेअर आणि सीटी रुग्णालयात प्रत्येकी १ रुग्णाला हलविण्यात आले. १६ जणांच्या नातेवाईकांनी त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात नेले. त्यामुळे सध्या भाभा रुग्णालयामध्ये सात जणांवर उपचार सुरू असून, एकाची प्रकृती गंभीर आहे. रुग्णालयात दाखल बहुतांश रुग्णांना गंभीर दुखापत झाली असून, या सर्व रुग्णांचे सीटी स्कॅन करण्यात आले आहे. सीटी स्कॅनचा अहवाल सामान्य आला असल्याची माहिती भाभा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ. पद्मश्री अहिरे यांनी दिली. रुग्णालयात दाखल रुग्णांपैकी चार जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये कनीस अन्सारी (५५), आफ्रिन शाह (१९), अनाम शेख (२०) आणि शिवम कश्यप (१८) यांचा समावेश आहे.




शीव रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या सात जणांपैकी एकाच मृत्यू झाला. मोहम्मद इस्लाम मोहम्मद निझाम अन्सारी (४९) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. आलम मेहता (२२) याच्या मेंदूत रक्तस्राव झाला असून, त्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. जोरात मार लागल्यामुळे फजूल रेहमान याच्या छातीत रक्तस्राव झाला. त्याच्या कमरेचे हाड मोडले आहे. या दोघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. सूद्दू कुमार (१६) याच्या डोक्याला मार लागला असून, मस्तान शेख (२९) याच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली. पंकज कुमार सिंग (३०) याच्या डाव्या डोळ्याला मार लागला आहे. मोहम्मद साजिद (२३) याच्या हाताला चार इंचाची जखमी झाली आहे, तसेच मोहम्मद इंजमाम उल हक (१९) याच्या उजव्या मांडीला दुखापत झाली आहे. या सर्व जखमींची प्रकृती स्थिर असून, त्यांच्यावर उपचार करण्यात येत असल्याची माहिती शीव रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मोहन जोशी यांनी दिली.

सेव्हन हिल रुग्णालयामध्ये चार जणांना दाखल करण्यात आले असून, हे चारही पोलीस आहेत. भाभा रुग्णालयात दाखल झालेल्या ३८ जखमींपैकी काहींच्या नातेवाईकांनी त्यांना खासगी रुग्णालयात हलविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भाभा रुग्णालयामध्ये त्यांची नोंद करून त्यांना रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आणि त्यांना खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. तर काही रुग्णांना थेट खासगी रुग्णालयातच नेण्यात आले. त्यानुसार हबीब रुग्णालयात सहा, फौजिया रुग्णालयात दोन, सीटी आणि कुर्ला नर्सिंग होममध्ये प्रत्येकी एका जखमीला दाखल करण्यात आले. तसेच कोहिनूर रुग्णालयात दाखल रुग्णांपैकी एकाच मृत्यू झाला असून, दोघांवर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती गंभीर आहे.

# अल्पवयीन मुलीवर मातृत्व लादले ; आरोपीस जन्मठेप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, बुलडाणा :** अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केल्याप्रकरणी मलकापूर न्यायालयाने आरोपीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसेच ५० हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास २ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षाही सुनावण्यात आली आहे.



बुलडाणा जिल्ह्यातील मलकापुर न्यायालयाचे जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा विशेष न्यायाधिश एस. व्ही. जाधव यांनी सोमवारी, ९ डिसेंबर रोजी हा निकाल दिला. पीडितेची डीएनए चाचणी निकालात निर्णायक घटक ठरली. मलकापुर येथील एका अल्पवयीन मुलीला किसना यादव सोनोने तसेच अमोल समाधान वानखेडे (राहणार मलकापूर) या दोघांनी त्यांचे घरी बोलावून लैंगिक अत्याचार केला. त्यामधून ती गर्भवती राहिली. सदर घटनेबाबत पिडितेने मलकापूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दोषारोपपत्र विशेष न्यायालय मलकापूरर येथे दाखल करण्यात आले होते. आरोपी किसना यादव सोनोने हा प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान फरार झाला. आरोपी अमोल समाधान वानखेडे याचा जामिन अर्ज न्यायालयाने फेटाळल्यानंतर त्यास न्यायालयीन बंदी ठेवून सदरचे प्रकरणपुढ चालवण्यात आले. आरोपी अमोल समाधान वानखेडे यांचेविरूद्ध सरकार पक्षातर्फे १७ साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी पिडीता, तिची आई, वैद्यकीय अधिकारी तसेच डी. एन.ए. तज्ञ, व तपास अधिकारी यांचे पुराव्यानंतर आरोपी अमोल समाधान वानखेडे याचे विरूद्ध गुन्हा सिद्ध झाला. अंतिम सुनावणी होवून सरकार पक्षातर्फे शैलेश जोशी विशेष सरकारी अभियोक्ता यांनी केलेला युक्तिवाद ग्राहय धरण्यात आला. आरोपी अमोल समाधान वानखेडे यास अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे कलम ६ सहवाचनिय कलम ५(जे) (ळळ)आणि ५ (१) नुसार जन्मठेप म्हणजेच उर्वरीत आयुष्य आहे तो पर्यंत शिक्षा तसेच २५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास दोन वर्षे सक्त

मजुरी तसेच कलम ४(२) पोक्सो कायद्यानुसार जन्मठेप व २५ हजार दंड, दंड न भरल्यास दोन वर्षे सक्त मजुरी तसेच कलम ३२३ भा.दं. वि.नुसार १ वर्षे शिक्षा तसेच कलम ५०६ भा.दं. वि. नुसार १वर्ष शिक्षा आरोपीस सुनावली आहे.

अमोल वानखेडे यांचेकडून ५० हजार रूपये दंड वसुल झाल्यानंतर सदर रक्कम पिडीतेस देण्याचा आदेशही न्यायालयाने दिला आहे .तसेच सामाजिक न्याय विभागा मार्फत देण्यात येणाऱ्या पिडीत नुकसान भरपाई योजनेअंतर्गत सुद्धा जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बुलढाणा यांना अतिरीक्त नुकसान भरपाई ठरवून पिडीतेस देण्याबाबत सुद्धा आदेश देण्यात आला आहे.

प्रकरणाचा तपास मलकापूर ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक गणेश शिंदे यांनी केला होता. तसेच पैरवी अधिकारी म्हणून पोलिस उपनिरीक्षक संतोष भिकाजी कोल्हे यांनी काम पाहिले. पिडीतेतर्फे ॲड. विशाल गोविंदा इंगळे यांनी सरकार पक्षास मदत केली.

# दुर्गाडी किल्ल्याला मिळाली ऐतिहासिक मुक्तता !

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१०, कल्याण (ठाणे) :** आजचा दिवस इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दुर्गाडी किल्ल्याला तब्बल ५० वर्षांनी कायदेशीर संघर्षातून मुक्तता मिळाली आहे. न्यायालयाने मुस्लिम संघटनांकडून धार्मिक वापरासाठी केलेला दावा फेटाळत, हा किल्ला छत्रपतींच्या ऐतिहासिक वारशाचा असल्याचा ऐतिहासिक निर्णय दिला आहे. दुर्गाडी किल्ल्यावरील मालकीचा वाद वर्षानुवर्षे चालू होता. अखेर, १० डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर प्रेम करणाऱ्या तमाम हिंदू बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने दिलेला हा निर्णय केवळ कायदेशीर विजय नाही, तर छत्रपतींच्या स्वराज्य स्थापनेच्या विचारांचा आणि गौरवशाली परंपरेचा सन्मान आहे. या ऐतिहासिक भूमीच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आणि समर्थकांचे मोलाचे योगदान यानिमित्ताने अधोरेखित झाले आहे. दुर्गाडी किल्ल्याचा महत्त्वाचा वारसा कायम ठेवण्यासाठी निर्धारदुर्गाडी किल्ल्याला मिळालेला हा न्याय हा केवळ ऐतिहासिक विजय नाही, तर हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणेचा विजय आहे. छत्रपतींच्या गौरवशाली परंपरेला साजेसा हा निर्णय येणाऱ्या पिढ्यांसाठी एक आदर्श ठरेल. किल्ल्याच्या जतनासाठी आता एकत्रित



प्रयत्नांची आवश्यकता आहे. छत्रपतींच्या विचारांना साजेसा हा दुर्ग भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान राहील, यासाठी आपण सर्वांनी भरीव योगदान देण्याचा निर्धार आजच्या या ऐतिहासिक विजयामुळे छत्रपतींच्या विचारांवर प्रेम करणाऱ्या जनतेमध्ये जल्लोषाचे वातावरण आहे. न्यायालयाच्या या निर्णयाबद्दल सर्व हिंदू बांधवांनी कृतज्ञता व्यक्त केली असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वाभिमानी परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचा वसा घेतला आहे.

## पिंपरीत सर्वाधिक लाडक्या बहिणीचे अर्ज बाद

**दि.१०, पिंपरी :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला पिंपरी-चिंचवड शहरातून मोठा प्रतिसाद मिळाला आहे. ४,३२,८९० महिलांनी अर्ज भरला. त्यांपैकी ३,८९,९२० महिला लाडक्या ठरल्या आहेत. तर, ४२ हजार ४८६ महिलांचा अर्ज बाद झाला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेत पात्र ठरणाऱ्या महिलांना दरमहा १५०० रुपये अर्थसाहाय्य केले जाते. ही रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. शहरातील रहाटणी येथील 'ड' क्षेत्रीय कार्यालय परिसरातील सर्वाधिक ६५,८७१ महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. पांजरपोळ, भोसरी येथील 'इ' क्षेत्रीय कार्यालयात ६३,१०६ आणि थेरगाव येथील 'ग' क्षेत्रीय कार्यालयात ६०,०३३ महिलांचे अर्ज योग्य ठरले आहेत. तर, निगडी येथील 'फ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील सर्वाधिक १०,८२९ महिलांचे अर्ज बाद करण्यात आले आहेत. 'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील ७०६२ अर्ज बाद झाले आहेत.

अक्षराज

२ बुलडाणा, बुधवार, दि.११ डिसेंबर २०२४ विविधा

# संपादकीय



## विधानसभेची नवी दिशा

अखेर ५ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्राचे एकविसावे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांनी शपथ घेतली. तसेच माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्र्यांची पदाची शपथ आझाद मैदानामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अन्य हजारो मान्यवरांच्या उपस्थितीत घेतली. आता लवकरच मंत्रिमंडळही आकाराला येईल. महाराष्ट्र विधानसभेत प्रचंड बहुमताने निवडून आलेल्या महायुती सरकारचे सरकारचे भरीव योगदान आगामी पाच वर्षात आपल्या महाराष्ट्राला सर्वार्थाने पुढे नेण्यामध्ये असावे ही अपेक्षा सर्वांचीच आहे.

त्यातही यंदा एकटा भाजप जवळपास बहुमताच्या रेषेपर्यंत पोहोचला. एवढा मोठा विजय महायुतीला आणि एवढा दारुण पराभव महाआघाडीला अपेक्षित नव्हता. लोकसभा निवडणुकीत महाआघाडीला संख्यात्मक दृष्ट्या मोठे यश मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर तो काहींना धक्कादायक वाटणाराही होता. अर्थात मतांच्या टक्केवारीत फारसा मोठा फरक नव्हता हे खरेच. कदाचित त्यामुळे महाआघाडी आपण सत्तेवर येणारच अशा हवेत राहिली. त्यातूनच जागा वाटपाचा घोळ अर्ज भरणाऱ्या तारखेपर्यंत झाला, मुख्यमंत्रीपदावर चर्चा केली गेली. या निवडणुकीत महायुती जेवढी एकसंघ पद्धतीने लढताना दिसत होती तितकी महाआघाडी दिसत नव्हती हे वास्तव आहे. या निवडणुकीत जनतेने भाजपच्या नेतृत्वाखालील युतीला अतिशय मोठ्या प्रमाणात निवडून दिलेले असल्याने आता राज्याच्या विकासात विरोधकांचा अडथळा आहे असे म्हणता येणार नाही. केंद्र सरकारचेही पूर्ण सहकार्य राज्य सरकारला असणार आहे. त्यामुळे राज्याची सर्व आघाड्यांवर होत असलेली घसरण थोपवून हे राज्य देशातील सर्वात अग्रगण्य राज्य म्हणून आघाडीवर आणण्याची संधी देवेंद्र फडणवीस यांना आहे. शिवाय त्यांचे भाजपमधील स्थान व वलय मोदी आणि शहा यांच्या पाठोपाठ अतिशय महत्त्वाचे झाले आहे. पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरही त्यांचे वजन वाढलेले आहे. त्याचाही लाभ त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी करून घ्यावा आणि शपथविधीच्या जाहिरातीत 'आता महाराष्ट्र थांबणार नाही' असे केलेले सूतोवाच खरे ठरावे ही अपेक्षा. मुख्यमंत्री म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेणारे देवेंद्र फडणवीस पाच वर्षाचा कार्यकाळ दुसऱ्यांदा पूर्ण करू शकतील असे दिसते. एकूण ही नवी विधानसभा नव्या दिशेने जाताना दिसत आहे.


निवडणूक काळात महायुतीने जे जाहीरनामे प्रकाशित केले त्यामधून दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे ही नव्या सरकारची नैतिक जबाबदारी आहे. महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न घटले आहे ते वाढवणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरात व इतरत्र न जाऊ देता राज्यात रोजगार निर्मिती करणे हेही महत्त्वाचे आहे. व्यवस्थेत वाढलेला भ्रष्टाचार समूळ नष्ट करणे अशक्य असले तरी त्यावर आळा घालण्याची नितांत गरज आहे. महाराष्ट्रातील सामाजिक – सांस्कृतिक वातावरण प्रदूषित होत चालले आहे. त्याच्या पर्यावरणात मोठी सुधारणा करण्याची गरज आहे. या साऱ्याची जबाबदारी अर्थातच मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांच्यावर आहे. कारण जे यशाचे शिल्पकार असतात ते अपयशी ठरत गेले तर त्यांनाच अपयशाचे धनी ठरवले जात असते. सरकार महायुतीचे असले तरी सर्व निर्णय केंद्रीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्रीच घेणार आणि दोन्ही उपमुख्यमंत्री 'मम' म्हणणार अशी महायुतीची नेपथ्य रचना आहे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि महाराष्ट्र हे देशातील महत्त्वाचे राज्य आहे. त्यामुळे केंद्राच्या सत्तेमध्ये यावेळी भाजप केवळ स्वबळावर नसल्यामुळे भाजपच्या दृष्टीने महाराष्ट्रातील हा विजय अत्यावश्यक होता. त्यासाठी त्यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले यात शंका नाही. साधनशुचिता हा शब्द राजकारणातून अलीकडे हद्दपार झालेला आहे. त्यापेक्षा साध्यप्रियता महत्त्वाची ठरलेली कोणीही यावे आणि पावन होऊन जावे अशी आजची स्थिती आहे. मुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सर्व माजी मुख्यमंत्र्यांना व विरोधी पक्षांतील नेत्यांना आपण व्यक्तिगत फोन करून शपथविधीला निमंत्रित केले होते हे त्यांनी आवर्जून नमूद केले ही चांगली बाब आहे.

# अभिनयातील भीष्माचार्य दिलीपकुमार

**''ट्रॅजीडी किंग म्हणून ओळखले जाणारे हिंदी चित्रपट सृष्टीतील भीष्माचार्य दिलीपकुमार यांची आज जयंती. बरोबर १०२ वर्षांपूर्वी म्हणजे ११ डिसेंबर १९२२ रोजी दिलीपकुमार यांचा जन्म पेशावर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहम्मद युसूफ खान असे होते. पेशावरहून त्यांचे कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईत आले.''**

दिलीपकुमार यांच्यासह बारा भावंडे होते. त्यांच्या कुटुंबात पाहुण्यांचाही राबता होता त्यामुळे आपणही काही तरी काम करून घर खर्चास मदत करावी असा विचार करून दिलीपकुमार पुण्याला आले. तिथे त्यांनी लष्करी कँटीनमध्ये मॅनेजरचा सहाय्यक म्हणून काम केले. दुसऱ्या महायुद्धात लष्करी कँटीनचे व्यवस्थापन बदलले आणि दिलीपकुमार जमा केलेले पाच हजार रुपये घेऊन घरी परत आले. मुंबईला आल्यावर त्यांना पुन्हा नोकरी शोधावी लागली. दिलीपकुमार हे नोकरीच्या शोधात आहे हे त्यांचे परिचित डॉ मसानी यांना समजले तेंव्हा डॉ मसानी यांनी त्यांना माहीम येथील बॉम्बे टॉकीजच्या स्टुडिओमध्ये देविका राणी यांच्याकडे घेऊन गेले. देविका राणी यांनी दिलीपकुमार यांचे राजबिंडे व्यक्तिमत्त्व आणि उर्दूवरील पकड पाहून त्यांना महिना बाराशे रुपये पगारावर अभिनय करण्याची ऑफर दिली. वास्तविक हा प्रस्ताव दिलीपकुमार यांना मान्य नव्हता कारण चित्रपटात अभिनय करावा असा विचार त्यांनी कधीही केला नव्हता पण महिना बाराशे रुपये मिळतात ही रक्कम त्याकाळी खूप मोठी होती त्यामुळे त्यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि देशाला एक महान अभिनय सम्राट मिळाला. देविका राणी यांनीच त्यांना दिलीपकुमार हे नाव दिले. १९४४ साली आलेल्या ज्वार भाटा या चित्रपटाद्वारे दिलीपकुमार यांनी आपल्या चित्रपट कारकिर्दीला सुरवात केली. १९४४ ते १९९८ पर्यंत म्हणजे सहा दशकापेक्षा अधिक काळ दिलीपकुमार यांनी आपल्या अभिनयाने गाजवून सोडला. या दरम्यान त्यांचे अनेक चित्रपट सुपरहिट झाले.



यात त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. अंदाज, राम और श्याम, आन, देवदास, आझाद, मुगल – ए – आझम, गंगा जमुना, नया दौर हे त्यांचे चित्रपट तर सुपरहिट झाले. या चित्रपटांनी तरुणाईला वेड लावले. १९५७ साली आलेल्या गंगा जमुना या चित्रपटातील मांग के साथ तुम्हारा...मैने मांग लिया संसार....या गाण्याने तरुणाईला वेड लावले होते. या चित्रपटात वैजयंती माला या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट रसिक त्यांच्या अभिनयाने इतके भारावले होते की त्याकाळच्या तरुणांचे ते आयडॉल बनले. देवदास या चित्रपटातील त्यांची भूमिका ही तर त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरली. त्यांच्या या चित्रपटातील भूमिकेचे नंतर अनेक अभिनेत्यांनी अनुकरण केले पण कोणालाही त्यांच्या अभिनयाच्या जवळपास पोहचता आले नाही. १९७६ साली आलेला बैराग हा चित्रपट त्यांचा नायक म्हणून शेवटचा चित्रपट ठरला या चित्रपटात त्यांनी तिहेरी भुमीका साकारली. त्यानंतर काहीकाळ ब्रेक घेऊन त्यांनी मनोज कुमार यांच्या क्रांती या चित्रपटापासून चरित्र अभिनेता म्हणून काम करण्यास सुरुवात केली. शक्ती, विधाता, मजदूर, दुनिया, मशाल, कर्मा या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका केल्या. सुभाष घई यांच्या सौदागर या चित्रपटात राजकुमार यांच्यासोबत त्यांची जुगलबंदी चांगलीच गाजली. १९९८ साली आलेला किला हा त्यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट ठरला. या दरम्यान त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी दिलीपकुमार यांना आठ पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांच्या अभिनय कारकिर्दीची योग्य दखल घेऊन पद्मभूषण, पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने त्यांना गौरवले. हिंदी चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले. पाकिस्ताननेही त्यांना निशान – ए – इम्तियाज या त्यांच्या सर्वोच्च पुरस्काराने गौरवले आहे. ७ जुलै २०२१ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे दुःखद निधन झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचेच नाही तर देशाचे मोठे नुकसान झाले. दिलीपकुमार यांच्या निधनाने अभिनयातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला. त्यांचा सारखा अभिनेता पुन्हा होणार नाही. अभिनय सम्राट दिलीपकुमार यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### लोकशाहीच्या नावाने...

आत्ताच सुत्राने,
दीली माहिती..!
अंधाराच्या भितीने...
लाईट लावले कीती..?

चोराने दावा केला,
माहितीच्या आधारे..!
आता बोंबतील कशाला...
उगा,बोंबलणारे..!

कारभार हाती आला...
माणूस म्हणून वागावे..!
प्रत्येक माणसाला...
इथे माणूस समजावे..!

गाय -म्हशी,घोडे-हत्ती...
नांदतात येथे एकोप्याने...!
माणूस का भांडत बसती...
लोकशाहीच्या नावाने...!

**– बबनराव वि.आराख**
**गांगलगाव जि. बुलडाणा**

### वर्णी..

मंत्रीमंडळ विस्तार
कुणाकुणाची वर्णी
वेग वेगळी ती नावे
अफवा होती कर्णी

घडे बडे चमत्कार
जसे नारळा पाणी
मिळतो तसाप्रसाद
जशी ज्याचीकरणी

सत्ता येणारजाणार
सत्य उघड रे जाणी
निंदानालस्ती नको
लाघवी हवी वाणी

करावे तसेचं भरावे
भिन्न न राजकारणी
टिकून रहायचे कसे
जाणी काही धोरणी

संस्कृती बंधन भले
हिरा शोभे कोंदणी
चांगला होता नेता
काळ करेल नोंदणी

होऊन फक्त कुंपण
करा शिवार राखणी
सत्तेने स्वताचं यावे
कारकीर्द हो देखणी

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# शहरात बेकायदा बांधकामे जोरात, प्रशासनाचे अधिकारी अनभिज्ञ



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, मुंब्रा (ठाणे) :** मुंब्रा,दिवा विभागीय समिती गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यात अपयशी ठरली आहे.अनेक तक्रारी आणि इशारे देऊनही,कौन्सिलच्या अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली आहे, ज्यामुळे त्यांच्या बेकायदेशीर कामांमध्ये गुंतलेल्या बांधकाम व्यावसायिकांना प्रोत्साहन मिळत आहे.

शहरातील बांधकाम व्यावसायिकांनी आता ते ८ मजले बांधून लोकांच्या जीवाशी खेळण्यास सुरुवात केली आहे.रात्री किंवा सुट्टीच्या दिवशी लोक बेकायदेशीरपणे बांधकाम करतात.त्यांच्यावर खटला भरण्याची शक्यता कमी असताना, जबाबदारी आणि अंमलबजावणीच्या अभावामुळे बांधकाम व्यावसायिकांना धीर आला आहे.जे आता परिस्थितीचा फायदा घेत बहुमजली इमारती बांधून परिसरात राहणाऱ्या निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात घालत आहेत.

शहरातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांवरही त्यांच्या अपयशाचा आरोप होत आहे. बेकायदा बांधकामांची माहिती असूनही त्यांनी या प्रश्नाकडे लक्ष देण्याचे टाळल्याने हा प्रकार चिंताजनक पातळीवर गेला आहे.महापालिकेच्या या निष्काळजीपणामुळे इमारत बांधकाम नियमांचे तर उल्लंघन होत आहेच, शिवाय सर्वसामान्यांची सुरक्षाही धोक्यात येत आहे.ही गंभीर समस्या सोडविण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावी,नागरिकांच्या सुरक्षेला अधिकाऱ्यांचे सर्वोच्च प्राधान्य असावे, अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

विनापरवानगी होत असलेल्या बेकायदा बांधकामांमुळे शहराचे स्वरूप बिघडत असून नियोजनबद्ध विकासाचे दावेही फोल ठरत आहेत. सत्ताधारी नेते आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने संपूर्ण शहरात हा मोठा खेळ मानला जात आहे.

शहरात सातत्याने निर्माण होणारी अस्ताव्यस्त काँक्रीटची जंगले येथील व्यवस्था व सुविधा उद्ध्वस्त करण्याकडे झुकत आहेत.बेकायदा बांधकाम करणाऱ्यांची मनमानी अशी आहे की, अनेक ठिकाणी खुलेआम इमारती बांधल्या जात आहेत.

# अशिक्षित आई वडिलांच्या पोटी उपजले देशसेवेचे बीज !

## संदेश गांगुर्डे सैन्य दलात दाखल

**अक्षराज : सौरभ कामडी**

**दि.१०, मोखाडा :** मोखाडा तालुक्यातील अटी दुर्गम आणि छोटे खाणी आडोशी गावात विलास कचरू गांगुर्डे हे बौद्ध कुटुंब वास्तव्य करून राहत आहें परंतु प्रसार माध्यम किंवा कोणतीही माहीत मिळण्याचा अभाव असताना देखील गांगुर्डे यांचा मुलगा संदेश याने अथक परिश्रम घेऊन भारतीय सैन्य दलात महार महार बटालियन मध्ये आपली वर्णी लावून घेतली आहें त्याची हि देशभक्ती पाहून बौद्ध समाज बांधवां सोबतच संपूर्ण गावाने संदेशला शुभेच्छा देत अक्षरशः महोत्सव साजरा केला आहे.

संदेश गांगुर्डे यांनी मध्यप्रदेश मधील सागर महार रेजिमेंट सेंटर येथे २२ मार्च ते ३ डिसेंबर दरम्याच्या नऊ महिन्यात कठोर परिश्रम घेऊन प्रशिक्षण घेतले आहें सिक्कीम येथे १८ मार्च रोजी जनरल ड्युटी पोस्टवर देश सेवेसाठी आता तो रुजू होणार आहें बाहेरचे जग पाहिले नसतानाही एका अशिक्षित



कुटुंबाने आपल्या मुलाला देश सेवेसाठी पाठविण्याचे धाडस करणे हे इतरांसाठी खूपच प्रेरणादायी आहें

ऊन, वारा पाऊस, हिम वर्षा किंवा कोणत्याही आपत्ती जन्य वातावरणात सीमेवर खंबीरपने देशाचे संरक्षण करण्याचे भाग्य लाभने हि कौतुकास्पद बाब आहें आणि अशिक्षित कुटुंबातून स्वतःच्या प्रयत्नातून हि संधी मिळविणे या सारखे दुसरे भाग्य नाही असे गौरवोद्गार मोखाडा पंचायत समितीचे उपसभापती यांनी काढले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरंचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून कोणत्याही परिस्थितीवर मात करण्याची जिद्द ठेवली की यश हाकेच्या अंतरावर असते मात्र त्याच्यावर धोरणात्मक अंमलबजावणी करण्याची गरज असते हि बाब लक्षात घेऊन संदेशने स्वतःच्या मेहनतीवर भारतीय सैन्य दलाला गवसनी घेतली आहें याचा मला सार्थ अभिमान आहे असे प्रतिपादन मोखाडा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पालवे यांनी केले आहें तर देशशेवेचा वसा घेऊन देशाचं रक्षण करण्याचा जन्मजात वसा लाभने हि भाग्याची गोष्ट असल्याचे मत ग्रामपंसंचायत विस्तार अधिकारी महेंद्र उबाळे यांनी व्यक्त केले आहें

कार्यक्रमा साठी भाऊराव गांगुर्डे रेल्वे गार्ड, ईश्वर गांगुर्डे समाज सेवक, प्रकाश दोंदे मॅनेजर,बाळू घाटाळ सरपंच, चंद्रकांत गांगुर्डे, रघुनाथ गांगुर्डे, बाळू गांगुर्डे, प्रकाश गांगुर्डे,अनंता पाटील,रमेश पाटील, मंगेश दाते सर्व पंचक्रोशीतील नातेवाईक, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी सूत्र संचालन संजय साळवे यांनी केले

# प्रशिक अधिकारी कर्मचारी संस्थेमार्फत आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन

**दि.१०, ठाणे :** प्रशिक सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संस्था (रजि.) महाराष्ट्र राज्य व नवयुग सिध्दार्थ क्रीडा मंडळ, अशोकनगर, वालधुनी, कल्याण (पूर्व) यांच्या सहकार्याने नुकतेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृह, अशोक नगर वालधुनी कल्याण येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात जवळपास १२५ ते १४० व्यक्तींनी सहभाग नोंदवून आपली आरोग्य तपासणी करून घेतली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, डोळे तपासणी, त्वचारोग व सर्वसाधारण आजार असलेल्या व्यक्तींची तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात अपोलो हॉस्पिटलचे आरोग्य पथकातील श्री.मनोज गुप्ता यांच्यासह डॉ.रेखा गायकवाड, डॉ.शतानवानजी हे कार्यरत होते. जायंट ग्रुप – जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशन, डोंबिवली युनिट १ चे डॉ.विकास जोशी व त्यांचे आरोग्य पथक यांनीही सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे भैरव सेवा समिती, भिवंडी यांचे पथकही सामील होते. तसेच डॉ.अशोक लोंढे व डॉ.शशिकांत ननावरे यांच्या पथकाने सहभाग नोंदवून लाभार्थ्यांची सर्वसाधारण तपासणी केली तर डॉ.ननावरे आणि डॉ.रवींद्र जाधव व त्यांच्या डॉ.सुरेखा जाधव यांनी रुग्णांची तपासणी करून औषधांचे वाटपही केले. या शिबिरात सर्व वैद्यकीय अधिकारी यांनी विनामूल्य आपला वेळ व सेवा प्रदान केली.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## तलासरीत सकल हिंदू समाज निमित्ताने महारॅलीचे आयोजन संपन्न



**अक्षराज : हरी कापसे**

**दि.१०, तलासरी (पालघर) :** मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता आजच्या जागतीक मानवाधिकार दिवसाचे औचित्य साधून श्रीराम मंदिर पाटीलपाडा तलासरी ते तहसील कार्यालय पर्यंत सकल हिंदु समाज निमित्ताने बांग्लादेशात राहत असलेला हिंदू बांधव परिवार सुरक्षित राहावे. यासाठी हिंदू न्याय यात्रा काढण्यात आली होती. बांग्लादेशमधील असलेल्या हिंदु बांधव समाजावर होणाऱ्या अत्याचार विषयी व बांगलादेशात इस्कॉन मंदिराचे चिन्मय कृष्णदास प्रभुजी यांना अटक केलेल्या विषयी तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या यात्रेत तलासरी इस्कॉनचे साधू संत, महाराज, महिला, युवावर्ग, व्यापारी वर्ग व सज्जन वर्ग यांचा सहभाग होता. तसेच विविध हिंदू संघटना,राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदु परिषद, बजरंग दल, भाजपा, नरेंद्र महाराज सत्संग असे यारॅलीत सहभागी झाले होते.

यावेळी हातात निषेध फलक व भगवे झेंडे घेऊन बांगलादेश में हिंदू अत्याचार बंद करो बंद करो, बांगलादेश सरकार हिंदू की रक्षा करो रक्षा करो, हिंदू समुदाय की सुरक्षा सुनिश्चित करो, जलते मंदिर करे पुकार भूल न जावो अत्याचार, भारत माता की जय अशा घोषणा देत रॅली तहसीलदार कार्यालयापर्यंत काढली. त्यानंतर नायब तहसीलदार यांना निवेदन पत्र दिले व राष्ट्रगान म्हणून शेवट केला. या रॅलीत पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता.

## बांगलादेशात हिंदू वरील अत्याचाराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजातर्फे तहसीलदारांना निवेदन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१०, पालम (परभणी) :** गेल्या काही महिन्यापासून बांगलादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदूच्या मानवाधिकार, मालमत्ता आणि जीवांचे हनन होत असल्याचे प्रकार प्रसार माध्यमातून निदर्शनास येत आहेत. बांगलादेशात गेल्या काही महिन्यांमध्ये हिंदू मंदिरावर झालेले हल्ले तोडफोड त्याचबरोबर हिंदू आबाल वृद्ध आणि महिलावर झालेले अमानवीय अत्याचार आणि त्यात सातत्याने होत असलेली वाढ हे गंभीर बाब असून अशा प्रकारच्या सर्व मानवाधिकाराचे हनन करणाऱ्या व्यक्तींना रोखण्यासाठी आपल्या स्तरावरून कार्यवाही व्हावी व अशा कार्यवाहीस आम्ही भारताचे हिंदू आपल्यासोबत ठामपणे आहोत. अशा आशयाचे निवेदन सकल हिंदू समाजातर्फे मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी पालम येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तहसीलदारां मार्फत देण्यात आले.सदरील निवेदनात बांगलादेशातील हिंदूचे धार्मिक स्थळ आणि मंदिराचे संरक्षण करण्यात यावे तसेच हिंदू धर्मीयांची केलेल्या बेकायदेशीर अटकेतून तात्काळ सुटका व्हावी, हिंदू महिलावर होणाऱ्या अ मानवीय अत्याचारांना प्रतिबंध घालावा व आंतरराष्ट्रीय समुदायास याबाबत अवगत करावे. तसेच समाज माध्यमे आणि समाजात होत असलेली हिंदूचे धार्मिक उत्पीडन थांबवण्यासाठी योग्य ती पावले उचलावी. या आशयाच्या मागण्या करत निवेदन सकल हिंदू समाजातर्फे आज देण्यात आले. यावेळी शहरासह तालुक्यातील मोठ्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित होते.

## आयुक्त पगारेसह विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांची धनगरवाडी अंगणवाडीस भेट



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१०, खंडाळा (सातारा) :** बालशिक्षण अधिक आनंदी करणे यावर मार्गदर्शन करण्यासाठी एकात्मिक बालविकास सेवा योजना मुबंईचे आयुक्त कैलास पगारे, उपायुक्त देवरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रोहिणी ढवळे (बा.क.) जि.प.सातारा यांनी नुकतीचधनगरवाडी अंगणवाडीस भेट दिली. भेटी दरम्यान अंगणवाडी कामकाजाचा आढावा घेतला. कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी बालशिक्षण अधिक आनंदी करण्यासाठी मार्गदर्शन केले.परांजपे ऑटो कास्टच्या आकार उपक्रमाचे यावेळी विशेष कौतुक अधिकारी वर्गाकडून करण्यात आले. बालविकास प्रकल्प अधिकारी छाया मगदूम यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.पर्यवेक्षिका उमा शेडगे, उषा मिठारी, दिग्विजय शिवतरे, वैभव घवाने, धनगरवाडी ग्रामपंचायत सरपंच यमुना अमोल शिवतरे तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य व राणी दडस, भारती माने, कविता मोटे, सुनंदा मोटे, मनिषा शिंदे, विजया मोटे तसेच धनगरवाडीमधील सर्व सेविका मदतनीस हजर होत्या.

## स्व.विष्णू सवरा यांच्या पुण्यस्मरणानिमित्त भव्य रक्तदान शिबिर


**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१०, जव्हार (पालघर) :** रक्तदान हे जीवनदान या प्रमाणे स्वर्गीय विष्णू सवरा यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण निमित्त ग्रामीण कुटीर रुग्णालय जव्हार येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. स्वर्गीय विष्णू सवरा यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण ग्रामीण कुटीर रुग्णालय जव्हार येथे ९ डिसेंबर रोजी सोमवारी रक्तदानाचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरात एकूण ६७ बॅग रक्तदात्यानी रक्तदान दिले. रक्तदान हे जीवनदान या निमित्ताने स्वर्गीय विष्णू सवरा यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण ग्रामीण कुटीर रुग्णालय जव्हार येथे ९ डिसेंबर रोजी सोमवारी रक्तदानाचे आयोजन केले होते. जव्हार हा ग्रामीण आदिवासी भाग असल्याने येथे नेहमीच रक्ताची गरज असते, यामध्ये गरोदर मातांना रोजच रक्त लागत असते, या भावनेतून स्वर्गीय विष्णू सवरा यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण निमित्त रक्तदान केले. यावेळी पालघर खासदार डॉ. हेमंत सवरा, जिल्हा अध्यक्ष भरत राजपूत, वैद्यकीय अधीक्षक डॉ. भरत महाले, सभापती विजया लहारे, तालुका अध्यक्ष कुणाला उदावंत, रक्तदाते उपस्थित होते.

# शेतकरी संघर्ष समिती विविध मागण्यांसाठी करणार केळी, गाजर वाटप आंदोलन

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१०, धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील शेतकर्यांच्या विविध मागण्यासंदर्भात शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने गुरुवार, दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता राष्ट्रीय महामार्ग ६५ वर नळदुर्ग बसस्थानका शेजारी शहापूर रोड येथे गांधीगिरी पद्धतीने केळी व गाजरे वाटप आंदोलन करण्यात येणार आहे. शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक दिलीप जोशी, जिल्हाध्यक्ष सरदारसिंग ठाकूर, तुळजापूर तालुकाध्यक्ष व्यंकट पाटील यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळाने मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी व नळदुर्ग पोलीस ठाण्यास देण्यात आले.


शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढणारी

शेतकरी संघर्ष समिती

धाराशिव

दिनांक ०९/१२/२०२५

प्रति,

मा. जिल्हाधिकारी साहेब ,

जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव

मार्फत,

मा. पोलीस निरीक्षक साहेब .

पोलीस ठाणे नळदुर्ग ता. तुळजापूर

अर्जदार - मा. दिलीप जोशी समन्वयक शेतकरी संघर्ष समिती मा.सरदारसिंग ठाकूर जिल्हाध्यक्ष शेतकरी संघर्ष समिती मा. व्यंकट पाटील तालुका अध्यक्ष ता. तुळजापूर शेतकरी संघर्ष समिती व समस्त शेतकरी समस्त संघर्ष समिती मो.९४०३९४५०५७ Email-288dilipjoshi@gmail.com

विषय - तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या मागण्या संदर्भात शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दिनांक १२/०१२/२०२४ रोजी वार गुरुवार दुपारी बारा वाजता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 65 वर नळदुर्ग बसस्थानका शेजारी शहापूर रोड येथे विविध मागण्या मान्य होण्यासाठी गांधीगिरी पद्धती ने केळी व गाजरे वाटप आंदोलन करणे बाबत,

महोदय

वरील विषयास अनुसरून तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पुढील महत्त्वाच्या मागण्या संदर्भात आंदोलन करणे आहे

१. सध्या आपल्या परिसरातील साखर कारखान्यांच्या गळीत हंगाम 2024 चालू झाले आहे परंतु शासनाकडून उसाचा दर निश्चित केलेले नसताना देखील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस सदरील कारखाने गळ स्पा साठी नेत आहेत गतवर्षी महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती असताना ...

निवेदनात म्हटले की, सध्या परिसरातील साखर कारखान्यांच्या गळीत हंगाम सुरू आहे. परंतु शासनाकडून उसाचा दर निश्चित केलेलं नसताना देखील ऊस उत्पादक शेतकर्यांचा ऊस सदरील कारखाने गाळपासाठी नेत आहेत. ऊस उत्पादनासाठी येणारा खर्च लक्षात घेता शासनाने किमान ३७०० रुपये प्रतिटन दर भाव घोषित करून सर्व कारखानदारांना आदेशित करण्यात यावे. सोयाबीन संदर्भात केंद्र व राज्य सरकारने घोषित केल्याप्रमाणे धाराशिव जिल्ह्यामध्ये सोयाबीन खरेदी केंद्र उशिरा सुरू करण्यात आल्याने उशीर झाल्यामुळे शेतकर्यांनी दिवाळी दसरा सणासाठी इतर कर्ज फेडण्यासाठी व दैनंदिन खर्च भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणात खाजगी व्यापारामध्ये अतिशय कमी भावात विक्री केली आहे.

शासनाच्या जाचक अटीमुळे शेतकर्यांचे आतोनात नुकसान झाले. सोयाबीन मधील आर्द्रता शासनाच्या नियमाप्रमाणे १२ टक्के किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदरील जाचक अटीमुळे शेतकर्यांचे सोयाबीन खरेदी केंद्रावर नाकारले गेले आहे.

सदरील बाब लक्षात आल्यावर केंद्रीय शेतकरी कल्याण मंडळांनी आर्द्रतेचे प्रमाण १५ टक्के पर्यंत ग्राह्य धरून १५ नोव्हेंबर २०२४ रोजी परिपत्रक काढले. मात्र त्या परिपत्रकाचे कोणत्याही खरेदी केंद्राने पालन केलेले नाही. अनेक शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांमध्ये हमाली व चाळणी या नावाखाली प्रति क्विंटल १०० ते १५० रुपये बेकायदेशीरपणे वसूल केले जात आहे. सदर अन्यायकारक खरेदी पद्धत बंद करून शेतकर्यांच्या हितासाठी सुटसुटीत व सोपी पद्धत करण्यात यावी. शासनाच्या अतिवृष्टी व दुष्काळ बाबतचे जे जुने निकष लावले जातात. जुन्या निकषामुळे दुष्काळ व अतिवृष्टीबाबत शेतकर्यांना विविध योजनेद्वारे मिळणारे फायदे शेतकर्यांना घेता येत नाहीत. त्यामुळे जुने निकष रद्द करण्यात यावे. महाराष्ट्रात २०२३ सालच्या दुष्काळामध्ये धाराशिव जिल्ह्यातील तीन तालुक्यांचा समावेश गंभीर स्वरूपाच्या दुष्काळ यादीत करण्यात आला.

तुळजापूर तालुक्यातील ९ महसूल मंडळामध्ये दुष्काळसदृश परिस्थितीची घोषणा करण्यात आली व शासनाने सवलती लागू केल्या. त्याच्या उपाययोजना व अंमलबजावणी काय करण्यात आली याची माहिती लेखी स्वरूपात शेतकरी संघर्ष समिती यांना मिळाली. यासाठी पाठपुरावा करण्यात आला. त्यामुळे तुळजापूर तहसीलदार यांनी सर्व संबंधित खात्यांना केलेल्या उपाययोजनाची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी असे पत्र दिले. तरीसुद्धा कोणत्याही कार्यालयाने माहिती उपलब्ध करून दिली नाही. यानंतर समितीच्या वतीने तहसील कार्यालय तुळजापूर येथे ठिय्या आंदोलन करण्यात आले. याला प्रतिसाद देत तहसीलदारांनी दिनांक ०९ सप्टेंबर २०२४ रोजी कोणतेही कार्यालय प्रतिसाद देत नसल्याबाबत बाबत जिल्हाधिकार्यांना लेखी पत्र दिले. सदरील पत्राच्या आधारे योग्य तो प्रतिसाद न देणार्या सर्व कार्यालय प्रमुख व संबंधित कर्मचारी यांची कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी विभागीय आयुक्त यांच्यामार्फत खातेनिहाय चौकशी करण्यात यावी. अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

त्याचबरोबर चालू वर्षामध्ये तुळजापूर तालुक्यात दुष्काळ व अतिवृष्टी झाली पण धाराशिव जिल्ह्यामध्ये तुळजापूर तालुका हा दुष्काळ व अतिवृष्टी झालेला तालुक्यातील शेतकर्यांना शासनाची कोणतीही शासकीय सवलत किंवा नुकसान भरपाई मिळू शकत नाही. तरी तुळजापूर तालुक्याचा दुष्काळ व अतिवृष्टी यादीत समावेश करून सर्व शेतकरी व विद्यार्थी यांच्यावरील अन्याय दूर करण्यात यावा. पीकविमा संदर्भात २५ टक्के अग्रीम विमा रक्कम अनेक लाभार्थी शेतकर्यांना मिळालेले नाही तरी तात्काळ वितरित करण्यात यावी व उर्वरित ७५ टक्के विमा केंद्र सरकारने २६ एप्रिल २०२४ चे जाचक परिपत्रक रद्द करून ७५ टक्के विम्याची रक्कम सर्व लाभार्थी शेतकर्यांना देण्यात यावी. तसेच सन २०२१ २०२२ व २३ मधील उर्वरित पीक विमा रक्कम न्यायालयात प्रलंबित प्रकरणामुळे वाटप न झालेली पीकविम्याची रक्कम महाराष्ट्र शासनाने वाटप करून शेतकर्यांना न्याय द्यावा.

उपाधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय तुळजापूर येथे कायमस्वरूपी उपाधीक्षक यांची नेमणूक करण्यात यावी. बरेच वर्ष सदरील कार्यालयाचा कारभार प्रभारी अधीक्षक यांच्यावर चालू असल्यामुळे शेतकर्यांची मोजणी प्रकरणे अनेक वर्षे प्रलंबित आहेत. शेतकर्यांना वारंवार कार्यालयात फेर्या माराव्या लागत असून त्यांची सर्व कामे खोळंबली आहेत. त्यासाठी पूर्ण वेळ उपाधीक्षक यांची तात्काळ नियुक्ती करण्यात यावी. अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनावर शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक दिलीप जोशी, जिल्हाध्यक्ष सरदारसिंग ठाकूर, तुळजापूर तालुकाध्यक्ष व्यंकट पाटील यांच्यासह पंडित पाटील, अजमोद्दीन शेख, महादेव बिराजदार, गुलाब शिंदे, बंडू मोरे, बालाजी ठाकुर, महेश घोडके, तोलू पाटील, दिलीप पाटील, शहानवाज शेख, गणपत सुरवसे, रहमान शेख, पीरपाशा इनामदार व इतरांची स्वाक्षरी आहे.

## ठाण्यात प्रथमच भरणार गृहनिर्माण संस्थाचे महाअधिवेशन

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१०, ठाणे :** गृहनिर्माण संस्थांच्या पुर्नविकासातील विविध समस्या व अडचणीबाबत चर्चा त्याचबरोबर, मार्गदर्शन करण्यासाठी २० ते २२ डिसेंबर या कालावधीत ठाण्यातील कोकणी पाडा, उपवन तलाव येथील मैदानात भव्य वातानुकुलीत मंडपात गृहनिर्माण संस्थाचे महाअधिवेशन आणि प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशन आणि सहकार विभाग, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे जिल्ह्यातील हे पहिलेच महाअधिवेशन यापूर्वी जून महिन्यात होणार होते. मात्र, कोकण पदवीधर निवडणूकीमुळे पुढे ढकलण्यात आले होते. सुमारे १० हजार सहकारी गृहनिर्माण संस्थाचे प्रतिनिधी या अधिवेशनाला उपस्थित राहणार असुन यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. अशी माहिती ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी दिली.

ठाणे जिल्ह्यातील ३४ हजार सहकारी गृहनिर्माण संस्थाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी, आजवर गृहनिर्माण संस्थांच्या अनेक समस्या सरकार दरबारी मांडून त्यांचे निरसन केले आहे. तरीही गृहनिर्माण संस्थांसाठी मोठया प्रमाणात कायद्यात तसेच नियम व उपविधीमध्ये बदल होणे अपेक्षित आहे. त्यासाठी हे महाअधिवेशन आयोजित केल्याचे सांगितले.

ठाण्यातील उपवन येथे प्रथमच होत असलेल्या या महाअधिवेशनामध्ये राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकार मंत्री, गृहनिर्माण मंत्री आदींसह आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, सहकार आयुक्त असे अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून अधिवेशनातील प्रदर्शनामध्ये गृहनिर्माण संस्थासाठी उपयुक्त ठरणाऱ्या वेगवेगळ्या व्यावसायिकांचे स्टॉल्स, विकासक, अर्थसाह्य करणाऱ्या संस्था त्याचबरोबर रेन हॉर्वेस्टींग व घनकचरा व्यवस्थापन करणाऱ्या संस्थांचे स्टॉल्स असणार आहेत.

तेव्हा, ठाणे जिल्ह्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांनी मोठया संख्येने उपस्थिती दर्शविण्यासाठी नोंदणी करावी,अथवा ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशनच्या कार्यालयात संपर्क साधावा. असे आवाहन सीताराम राणे यांनी केले आहे.

दरम्यान या महाअधिवेशनात गृहनिर्माण संस्थांचा पुर्नविकास, त्याचबरोबर वेगवेगळ्या कारणांनी रखडलेले पुर्नविकास प्रकल्प, स्वयंपुर्ण विकासाच्या समस्या आणि स्वयंपूर्ण विकासासाठी अर्थसाह्य, वारंवार खोट्या तक्रारी करणाऱ्या विरुद्ध कारवाईची मागणी, गृहनिर्माण संस्थांच्या सहकार कायद्यात सुधारणा तसेच, आवश्यक ते बदल या बरोबरच गृहनिर्माण संस्थांच्या वेगवेगळ्या समस्या तसेच, अडचणी आदी विषयांवर मार्गदर्शन करून त्या संदर्भात शासनाकडे पाठपुरावा केला जाणार आहे.

त्याचबरोबर, गृहनिर्माण संस्था संदर्भातील वेगवेगळे ठराव देखील अधिवेशनात पारित केले जाणार आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पहिल्याच महाअधिवेशनात सहभागी होण्यासाठी हाऊसिंग फेडरेशनने https://bit.ly/thanehousingmahaadhiveshan2024 ही लिंक उपलब्ध केली आहे. १५ डिसेंबरपर्यंत आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन सीताराम राणे यांनी केले आहे.


## इयत्ता ५- ७ वी च्या विद्यार्थ्यांना हाप पॅन्ट ऐवेजी फुल पॅन्ट वाटप करण्याची मागणी

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१०, कळंब :** कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या वतीने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात स्काऊट व गाईड विषयास अनुरुप गणवेश वितरण करण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अंतर्गत गणवेश योजनेचा लाभ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता१ली ते ८ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या सर्व मुली, अनुसूचित जाती मुले, अनुसूचित जमाती मुले, तसेच दारिद्र रेषेखालील पालकांची मुले यांना प्रत्येकी दोन गणवेश यांचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे खामसवाडी येथील जिल्हा परिषद प्रशालेत ही विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले आहे.

परंतु इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना फुल पॅन्ट ऐवेजी हाप पॅन्ट दिली असल्यामुळे सदरील विद्यार्थ्यांना पॅन्ट घालन्यास अडचणी होत आहेत. काही विद्यार्थी हे वयाने जरी लहान असले तरी शरीराने मोठे झालेले आहेत त्यामुळे सदरील विद्यार्थ्यांना हाप पॅन्ट घातल्याने अगदी ओशाळल्या सारखे वाटत आहे. तर सद्यस्थितीत थंडीचे दिवस असल्याने त्यांना अर्धवट पॅन्ट घातल्याने थंडी वाजण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे इयत्ता ५वी ते ७ वी च्या खामसवाडी येथील एकुण १०५ विद्यार्थ्यांना हाप पॅन्ट ऐवेजी फुल पॅन्ट द्यावी अशी मागणी शालेय शिक्षण कमिटीचे अध्यक्ष राम शेळके यांनी शाळेचे मुख्याध्यापक व कळंब येथील गट शिक्षणाधिकारी कार्यालय यांना विनंती अर्जाद्वारे मागणी केली आहे. सदरील अर्जावर राम शेळके यांची स्वाक्षरी आहे.

## बांग्लादेशाच्या निषेधार्थ जव्हार शहरात सकल हिंदू समाजाचा मोर्चा




**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१०, जव्हार (पालघर) :** बांग्लादेशात हिंदू समाजावर जो अन्याय सुरू आहे. त्याची जागतिक पातळीवर दखल घ्यावी व हा अन्याय, अत्याचार त्वरित थांबवावा, हिंदू समाज हा आता एकवटला असून यापुढे हिंदुंवर कुठेही अन्याय सहन केला जाणार नाही असा इशारा विक्रमगड विधानसभेचे आमदार हरिश्चंद्र भोये यांनी दिला. देश सुरक्षित ठेवायचा असेल तर अशा प्रकारे हिंदूंनी एकत्र येण्याचे आव्हान त्यांनी केले. दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी ११ वाजता सकल हिंदू समाजातर्फे हनुमान पॉईंट येथून हनुमानाच्या मंदिरातून , हनुमान चालीसा पठण करून हा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चाला जव्हार तालुक्यातून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोर्चामध्ये एकवटलेल्या हजारो हिंदू बांधवांनी हाती भगवे ध्वज घेऊन, बांग्लादेशच्या विरोधात फलक झळकवले. जव्हारच्या हनुमान पॉईंट इथून मोर्चाला सुरुवात झाली व हा मोर्चा जव्हार च्या प्रांताधिकारी कार्यालयाजवळ विसर्जित करण्यात आला. यावेळी नागरिकांनी भारत मातेचा जयजयकार करून बांग्लादेशाचा धिक्कार केला. बांग्लादेशात मुस्लिम कट्टरता वाद्याकडून हिंदू आणि अन्य अल्पसंख्यांक समुदायावर गंभीर अत्याचार केले जात आहेत. मंदिरे, घरे आणि दुकाने पेटवून दिली जात आहेत. हिंदू महिलांवर अमानवी अत्याचार होत आहेत. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने याची दखल घ्यावी व हिंदू समाजावरील होणारे अत्याचार थांबवावे आणि इस्कॉनच्या साधूची तात्काळ मुक्तता करावी आदी मागण्या मोर्चात करण्यात आल्या, तसेच सह्यांची मोहीम राबवून हिंदू समाजाच्या भावना सरकारला पोहोचण्यासाठी एक निवेदन देखील जव्हारच्या प्रांत अधिकाऱ्यांना देण्यात आले.या वेळी हिंदु समाजाच्या अनेक संघटना या मोर्चात सहभागी झाल्या होत्या.

